# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

## साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा

बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट)धुणे व गादीच्या खोळी धुणे कामासाठीची ई-निविदा.

सन २०२५-२६

(एका वर्षाकरीता)

**A. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन भक्त निवास्थानांमध्ये साईभक्तांना निवासाची सोय उपलब्ध करुन देण्यात येते. सदर निवासस्थानांमध्ये बेडशीट, उशी कव्हर, टॉवेल, सोलापुर चादर, ब्लँकैट व खोळी साईभक्तांना उपलब्ध करुन दिले जातात. हे सर्व साहित्य स्वच्छ धुणे, वाळविणे इस्त्री करणेचे कामासाठी सदरची ई-निविदा काढण्यात येत आहे.**

**याबाबतची सर्व तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे:-**

**B. ई- निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. खालील नमुद सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ते ऑनलाईन तांत्रिक बीडमध्ये अपलोड करावेत.

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | लॉन्ड्री कार्यान्वीत असलेबाबत ग्रामपंचायत/नगरपंचायत, नगरपालिका किंवा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी यापैकी एक प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासन जिल्हा उद्योग केंद्र यांचे प्रमाणपत्र. |
| २ | GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. |
| ३ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र. |
| ४ | कर्मचारी राज्य विमा महामंडळ रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. |
| ५ | पॅन कार्ड. |
| ६ | Technical Document पा.नं.५ अ.नं.२, वर नमूद लॉण्ड्री संदर्भातील संस्थान प्रशासनाने नमुद केलेली मशिनरी लॉण्ड्री निविदाधारकाकडे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. फर्मचा शिक्का/सही करुन ते पान स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावे. |
| ७ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले/असलेबाबतचे हमीपत्र लेडरहेडवर सही शिकुयानिशी सादर करावे. |
| ८ | निविदाधारकाची लॉन्ड्री कामाचे क्षेत्रात सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या एका आर्थिक वर्षामध्ये किमान रु.१० लाख उलाढाल असावी. तसेच चार्टड अकाऊंटंट यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. |
| ९ | फर्म स्वः मालकीची असलेबाबत ७/१२ उतारा सादर करावा. |

२. लॉण्ड्रीधारक वरीलप्रमाणे तांत्रिक दृष्या तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेनंतर त्या सर्व लॉण्ड्रींना संस्थान नियुक्त समिती भेट देईल. सदर समितीने अहवाल सादर केलेनंतर ज्या लॉण्ड्री धारकांचा अहवाल सकारात्मक येईल अशा लॉण्ड्री धारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येईल. व त्यातील न्युनतम दरधारकाला सदर कामाचा पुरवठा आदेश देण्यात येईल.

संस्थान अधिकारी यांचा पहाणीबाबतचा अहवाल सकारात्मक असल्यास पात्र व नकारात्मक असल्यास अपात्र गृहीत धरण्यात येईल.

**C. कामाचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम -**

१. साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा करीता एकत्रित ई-निविदेमध्ये बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणेकामी ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावयाचे आहे.

२. ई-निविदा फी रक्कम रु. ११,०००/- (अक्षरी रुपये - अकरा हजार मात्र) व बयाणा रक्कम (EMD) रु.१,१०,०००/- (अक्षरी रु. एक लाख दहा हजार मात्र) रक्कम शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जमा करावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागु नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**D. निविदाधारकांसाठी सुचना –**

१. लॉण्ड्री कामाची ई-निविदा दि.२६/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत दि.१७/०३/२०२५ सायं. ०५:०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई- निविदा भरणेपुर्वी ई- निविदाबाबत प्री-बीड मीटींगसाठी निविदाधारक उपस्थित राहु शकतील. प्री-बीड मीटींग वार-बुधवार दिनांकः-०५/०३/२०२५ रोजी ११ :०० वाजता साईसभागृह (लेंडीबाग झिरोनंबर हॉल) येथे ठेवण्यात आलेली आहे. प्री- बीड च्या तारखेत व वेळेमध्ये काही बदल झाल्यास संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि.१८/०३/२०२५ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकांचीच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी यांनी शक्य असल्यास उपस्थित रहावे.

६. अपुर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरताना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. कमर्शिअल बीडमध्ये ऑनलाईन दर भरतांना निविदाधारकाने सर्व करासह रक्कम नमूद करावी. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार जी.एस.टी.ची रक्कम विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहिल. तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा महामंडळ निधी व जी.एस.टी इ. भरणे शासनाकडे केलेबाबतची चलन प्रत व बील निहाय गोषवारा दरमहा बीलासोबत संस्थान प्रशासनाकडे सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा महामंडळ निधी व जी.एस.टी ची रक्कम संस्थान प्रशासनाकडे मागणीचा अधिकार निविदाधारकास राहणार नाही.

२. कपडे धुण्यासाठी उच्च प्रतिचे केमिकल व डिटर्जंन्ट ISI ट्रेडमार्क असलेली, कपडे धुण्यासाठी स्वच्छ पाणी, सुकविणेसाठी जागा, मशिनरी, विज, कपडे घेऊन जाने व आणणेकामी वापरावयाचे वाहनाचा खर्च व नियुक्त केलेल्या कामगारांचे जाणे-येण्याचा खर्च तसेच चहापाणी/जेवण/नाष्टा/राहाणेचा खर्च या सर्व बाबींचा विचार करुनच दर भरावेत.

३. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातुन कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. नियमानुसार आवश्यक कर रकमेची कपात करणेत येईल.

५. निविदाधारकाने ई-निविदा भरणेपुर्वी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळेमधील प्रत्यक्ष करावयाच्या कामाची पहाणी व सखोल अभ्यास करुन माहिती घेवून कमर्शिअल बीड सादर करावे.

६. पुढील वर्षासाठी नविन ठेकेदाराला कार्यादेश पारीत होऊन नविन ठेकेदाराने काम सुरु करेपर्यंत,आहे त्याच मंजुर दरात पुढील तिन महिने काम करुन देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. या कालावधीत दरात कोणत्याही प्रकारची वाढ दिली अथवा मागणी करता येणार नाही.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपद्धती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांची संस्थानने नमुद केलेल्या मशिनरी उपलब्धतेबाबत परिक्षण करण्यासाठी संस्थान अधिकारी यांची समिती आपल्या लॉण्ड्रीला समक्ष भेट देण्याकरीता येतील. त्यांचे पहाणी अहवालानुसार ई-निविदेतील नमूद उपलब्ध मशिनरी व इतर बाबी उपलब्ध असलेबाबत खात्री करण्यात येईल व ते उपलब्ध नसल्यास निविदाधारकांचा विचार केला जाणार नाही.

२. संस्थानने नमुद केलेल्या मशिनरी परिक्षण केलेनंतर वरील पाहणी अहवालामध्ये पात्र ठरलेले लॉण्ड्री धारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन दरांचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा वाटाघाटी करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**G. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. सदरचे कपडे धुणे व लॉण्ड्री कामासाठी अंदाजे खर्च रक्कम रु.१,०६,८९,१६२/- निश्चित केलेला आहे. त्यामुळे ज्यांची ई-निविदा मान्य होईल त्या निविदाधारकास या कामासाठी ३% रक्कम रु.३,२०,६७५/- सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे जमा करावयाची आहे. ई-निविदेत व कार्यादेशात नमुद केलेल्या कामाबद्दल कोणतीही तक्रार नसेल, तर कामाचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही किंवा निविदाधारकास मागणी करता येणार नाही.

२. निविदा मंजूर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत भरावी लागेल. सदर प्रकरणी करावयाचा करारनामा नोंदणीकृत करणेसाठी येणारा खर्च व नोटरी खर्च निविदाधारक यांना करावा लागेल. कार्यादेश दिल्यानंतर १५ दिवसांचे आत करारनामा रु.१०००/- चा गैरन्यायीक स्टॅम्प पेपर नोटरी करुन देणे बंधनकारक राहील.

३. दैनंदिन लॉण्ड्री कामासाठी बेडशीट, उशी कव्हर, सोलापूर चादर, चादर (ब्लॅकेट), टॉवेल व गादींच्या खोळी अशा सहा बाबींसाठी दर मागविण्यात आलेले आहेत. यामध्ये प्रत्येक बाबींचे स्वतंत्र न्युनतम दर विचारात घेतले जातील.

**H. कपडे धुवुन पुरवठा करण्याची मुदत-**

१. लॉण्ड्री कामाची ई-निविदा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ अखेरचे कालावधीसाठीची आहे व ती ऑनलाईन सादर करावयाची आहे.

२. कपडे धुणे व इस्त्री करणे कामी साईआश्रम भक्तनिवास मधील A ते L या १२ निवासी इमारतीमधून तसेच साईधर्मशाळा A, B, C, D, E, F या ६ इमारतीमधून स्वतःचे वाहनामध्ये कपडे घेऊन जाणे व पुन्हा दुस-या दिवशी सकाळी वेळेवर पोहोच करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३. लॉण्ड्री कामासाठी वापरत असलेली मशिनरी बंद अथवा खराब झाल्यामुळे लॉण्ड्री काम थांबल्यामुळे संस्थानचे कपडे पुरविण्यास उशीर होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करुन कपडे धुवून इस्त्री करुन देणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

४. दैनंदिन लॉण्ड्रीसाठी साईआश्रम व साईधर्मशाळा विभागाकडुन देण्यात येणा-या कपड्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| कपड्याचा तपशील | मासिक सरासरी कपड्यांची अंदाजे संख्या | | सूचना |
|---|---|---|---|
| | साईआश्रम भक्तनिवास | साई धर्मशाळा | |
| बेडशीट | २३,०४५ | ३,५०० | याप्रमाणे महिण्यासाठी कपड्यांची संख्या स्वच्छ धुणे व इस्त्री करणे कामी राहिल. अंदाजे भक्तांचे गर्दीनुसार संख्येमध्ये बदल होऊ शकतो. तसेच गादीच्या खोळी फक्त उत्सव कालावधीत टाकणेत येणा-या मंडपमधून निघेल त्याप्रमाणे राहील. |
| उशी कव्हर | ३२,१०१ | ३,५०० | |
| सोलापूर चादर | ८,६४९ | १,००० | |
| चादर (ब्लॅकेट) | ४,४३२ | ३,००० | |
| टॉवेल | २,९५६ | ३,००० | |
| गादीच्या खोळी | --- | १,५०० | |
| एकुण | ७१,१८३ | १५,५०० | |
| एका महिन्यासाठी एकूण कपड्यांची संख्या = ८६,६८३ | | | |

५. उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या कपड्यांची संख्या कमी जास्त होऊ शकते. जर काही अपरिहार्य कारणास्तव उदा. कोव्हीड-१९ सारख्या साथीचे रोग, युद्ध किंवा इतर कोणत्याही परिस्थितीत ज्याप्रमाणात साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी देण्यात येणा-या कपड्यांची संख्या असेल त्याप्रमाणात कपडे धुणे व इस्त्री करुन देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. लॉण्ड्री कमी किंवा जास्त संख्येबाबत निविदाधारकास मागणी करता येणार नाही.

६. उलटी केलेले अथवा इतर डाग पडलेले कपडे निविदाधारक यांनी प्रथम जंतूनाशक रसायनाचा वापर करुन धुवावेत व नंतर नेहमी प्रमाणे स्वच्छ धुवावेत.

७. निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल किंवा काम समाधानकारक करत नसेल, तर निविदाधारकास दिलेला कार्यादेश कुठलीही पुर्व सूचना न देता रद्द करुन संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. याबाबत मा. तदर्थ समिती/ मा. व्यवस्थापन समिती/ मा. उपसमिती / मा. मख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो संबंधीतांवर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालनार नाही.

**I. लॉण्ड्री स्वीकार करण्याची पध्दत व निविदा स्विकार करण्याची पध्दत-**

१. लॉण्ड्री केलेले कपडे अस्वच्छ दिसून आल्यास किंवा व्यवस्थित इस्त्री केलेली नसल्यास स्वीकारले जाणार नाहीत ते कपडे निविदाधारकाला पुन्हा धुवून इस्त्री करुन द्यावे लागतील. व त्याचा अतिरिक्त मोबदला मिळणार नाही.

२. लॉण्ड्री निविदाधारकास लॉण्ड्री कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर वेळप्रसंगी संस्थानचे इतर निवासस्थानाकडील कपडे स्वीकारावे लागतील व मंजूर दरातच धुवून व इस्त्री करुन घ्यावे लागतील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा वाढीव दर दिला जाणार नाही किंवा मागणी करता येणार नाही.

३. संस्थानचे कपडे यामध्ये न्यूनतम दरधारक हे वेगवेगळे असल्यास त्याप्रमाणे दर स्विकृत करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाकडे राहील.

**J. बील अदा करण्याची पध्दती –**

१. दरमहा मागील महिन्यातील GST, कर्मचारी यांचे PF व ESIC वगैरे इ. चलनांची पुर्तता केल्यानंतर तपशीलासह चालू महिन्याचे बील सादर करावे.

२. साईआश्रम भक्तनिवास व. साईधर्मशाळा विभागामधील अधिक्षक यांनी काम प्रमाणीत करणे व त्यास मान्यता दिल्यानंतरच दरमहाचे लॉण्ड्री कामाच्या बीलाची रक्कम अदा करणेत येईल

३. कार्यादेश दिलेनंतर जर काम समाधानकारक आढळले नाही तर पर्यायी व्यवस्था म्हणून दुस-या लॉन्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून बाजारभावाप्रमाणे सदरचे लॉण्ड्री काम करुन घेतले जाईल, व त्याचा जादा येणारा खर्च संबंधीत कॉन्ट्रॅक्टरच्या बीलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातुन कपात करणेत येईल.

**K. आपत्ती/ नैसर्गीक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद-**

१. कपडे धुवून व इस्त्री करुन दिल्यानंतर त्यामध्ये अस्वच्छ, डाग व खराब कपडे आढळून आल्यास, पुन्हा विना शुल्क कपडे धुवून घ्यावे लागेल. समाधानकारक धुतलेले नसतील तर संस्थानमार्फत खालील तक्त्यात नमुद प्रमाणे दंड आकारणेत येईल.

| अ.नं. | कपड्यांची संख्या | दंडाची रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | १०० ते ५०० | २०००/- |
| २. | ५०० ते १००० | ४०००/- |
| ३. | १००० ते २००० | ६०००/- |

२. काम समानधानकारक आढळून न आल्यास त्या महिन्याच्या कामाच्या एकूण बीलामधून ५ % पर्यंत दंडाची रक्कम कपात केली जाईल. कपात केलेली रक्कम निविदाधारकास मागणी करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. ई-निविदेत नमुद केलेल्या कामासाठी निविदाधारक यांनी दुस-या लॉण्ड्रीधारकास काम दिल्याचे आढळल्यास निविदाधारकाचे लॉण्ड्रीचे काम रद्द करुन, सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४. संस्थानचे कपडे फाटल्यास अथवा हरवल्यास त्याची किंमत नुकसान भरपाई म्हणुन संबंधिताकडून वसुल केली जाईल. ई-निविदेतील अटी शर्ती तसेच करारनाम्यानुसार कुठल्याही प्रकारच्या अटी शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षित अनामत रकमेतून दंड वसूल करण्याचा अगर उचित कारवाई करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

**L. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासुन ९० दिवसांचा राहील.

**M. सर्वसाधारण अटी शर्ती-**

१. निविदाधारकाने अथवा त्यांचे कर्मचा-याने संस्थानचे परिसरात काम करताना संस्थानच्या कुठल्याही नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. जेणे करुन संस्थान परिसरात शांतता राहील व संस्थान मालमत्तेचे नुकसान होणार नाही. तसेच साईभक्तांची सुरक्षितता आबाधित राहील याची काळजी संबंधितांनी घ्यावयाची आहे.

२. ई-निविदेसंबंधी काही शंका असेल तर निविदाधारकांनी संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास कार्यालयात दुरध्वनी क्र.(०२४२३) २५९३०२ / २५९३०३ साईधर्मशाळा दुरध्वनी क्र.(०२४२३) २५९६०१/०५ वर संपर्क करावा.

३. कपडे ने-आण करणा-या वाहनास अपघात व त्यातील कर्मचा-यास काही इजा झाल्यास किंवा इतर कारणास्तव दुखापत झाल्यास कामगार नुकसान भरपाई कायदा १९३३ नुसार भरपाई द्यावयाची झाल्यास ती जबाबदारी निविदाधारकाची राहील.

४. कोणतीही ई-निविदा स्वीकारण्याचा, नाकारण्याचा, अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही

५. संस्थानचे सदर लॉण्ड्री कामाचा व्याप विचारात घेता निविदाधारकाकडे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

६. सदर कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर संबंधीत लॉण्ड्री निविदाधारकास कायद्यानुसार लेबर लायसन्सची पुर्तता महिन्याच्या आत करुन देणे बंधनकारक राहिल. याबाबत विलंब केल्यास देय रकमेतून दरमहा रु.५००/- (अक्षरी रु.पाचशे रुपये) दंड वसूल करणेत येईल.

७. सदरच्या व्यवहाराबाबत काही वाद उपस्थित झाल्यास कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास उभय पक्षकारांना सदरचा वाद हा मा. सिव्हिल जज्ज ज्युनियर डिव्हीजन राहाता कोर्ट, मा. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन राहाता कोर्ट, मा. जिल्हा व सत्र न्यायालय, राहाता कोर्ट, मा, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातच करता येईल. अन्य कोर्टात वाद दाखल करता येणार नाही.

८. उपरोक्त शर्ती-अटी यापैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी-शर्ती विहीत करणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

-

*** निविदाधारकाची माहिती ***

१) निविदाधारकाचे नांव :-----------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता :-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

कार्यालय फोन क्रमांक -----------------------------------------------------------------------

निवास - -----------------------------------------------------------------------

ऑफीस - -----------------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- -----------------------------------------------------------------------

मोबाईल नंबर - -----------------------------------------------------------------------

ई-मेल - -----------------------------------------------------------------------

३) संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव -----------------------------------------------------------------------

फोन क्रमांक-----------------------------------------------------------------------

४) मालकाचे /भागीदारांची नांवे १) -----------------------------------------------------------------------

२) -----------------------------------------------------------------------

५) (अ) बॅक खाते नंबर :- -----------------------------------------------------------------------

(ब) आय.एफ.एस.सी.कोड :- -----------------------------------------------------------------------

**निविदाधारकाची सही व शिक्का**

---

कार्यालयीन कामकाजाकरीता

# ❖मार्गदर्शन पर इतर माहिती❖

## कामाचा तपशील

साईआश्रम भक्तनिवासमध्ये भक्तांचे निवासासाठी A ते L अशा एकूण १२ इमारती आहेत. त्यापैकी A,B व C या ३ इमारतीमध्ये ३८४ वातानुकूलीत खोल्या आहेत. तर D ते L या ९ इमारतींमध्ये ११५२ वातानुकूलीत यंत्रणा विरहित खोल्या आहेत. प्रत्येक इमारतीत ४ माळे असून एका माळ्यावर ३२ रुम आहेत. अशा सर्व इमारती मिळून एकूण १५३६ खोल्या या विभागात आहेत. इमारतीच्या प्रत्येक माळ्यावर दोन स्टोअर्स आहेत. असे १२ इमारतीमध्ये एकूण ९६ स्टोअर्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात A ते F एकूण ६ इमारती असून प्रत्येक इमारतीत ४ माळे असून ३२ हॉल आहेत. असे एकूण १२८ हॉल आहे. इमारतीच्या प्रत्येक माळ्यावर दोन स्टोअर्स एका इमारतीमध्ये ०८ स्टोअर्स आहेत. असे ६ इमारतीमध्ये एकूण ४८ स्टोअर्स आहेत. प्रत्येक माळ्यावर हाऊसकिपींग कंपनीचा एक आऊटसोर्स मदतनीस २४ तास कार्यरत असतो. लॉण्ड्री कामासाठी याच कंपनीचे लॉण्ड्री मदतनीस असतात. त्याबाबतचे पर्यवेक्षकीय कामकाजासाठी संस्थानचा स्थायी कर्मचारी असतो.

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळेमधील बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणे करीता नेण्यासाठी आपणास दररोज सकाळी ०७:०० वाजता आपल्या स्वत:चे वाहनासह विभागात हजर रहावे लागेल. हॉल व खोलीमध्ये भक्तांनी वापरलेले कपडे धुणे व इस्त्रीकरणे कामासाठी देणे करीता लॉण्ड्री मदतनीस यांनी प्रत्येक इमारतीचे ४ माळ्यांवरील सर्व कपडे इमारतीच्या तळ माळ्यावर मोजून गोळा करुन ठेवलेले असतात. ते आपण स्वत: पुन्हा मोजदाद करुन ताब्यात घ्यावयाचे आहे. याप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागातील १२ इमारतींचे व साई धर्मशाळा विभागातील ६ इमारतीतील कपडे मोजून ताब्यात घेतल्यानंतर संस्थानचे स्थायी कर्मचा-याकडून संस्थानच्या डी.पी. पुस्तकावर इमारत निहाय सदरच्या कपड्यांच्या नोंदी करतील. सदर कपडे धुणे व इस्त्री करणे देण्यात येत आहेत याची माहिती म्हणून त्यावर आऊटसोर्सिंग कंपनीचे जनरल मॅनेजर तसेच संस्थानचे शिफ्ट पर्यवेक्षक यांच्या स्वाक्षरी असतील. डी.पी. पुस्तकावरील केलेल्या नोंदीबरोबर असून त्याप्रमाणे कपडे धुणेसाठी ताब्यात मिळाले आहेत, यासाठी निविदाधारक यांना डी.पी. पुस्तकावर स्वाक्षरी करावी लागेल. त्याची एक प्रत निविदाधारक यांना दिली जाईल.

वरील प्रमाणेच अगोरदच्या दिवशी धुणे व इस्त्री करणे करीता नेलेले कपडे दुस-या दिवशी धुऊन परत करावयाचे आहे. धुऊन आणलेले कपडे निविदाधारक यांनी स्वत:च्या वाहनाने प्रत्येक इमारतीच्या तळ माळ्यावर लॉण्ड्री मदतनीस यांचे ताब्यात मोजून द्यावयाची आहे. परंतू धुऊन आलेले कपडे स्वच्छ धुतलेले किंवा व्यवस्थीत इस्त्री केलेले नसले तर ते पुन्हा विना मुल्य धुणेसाठी किंवा इस्त्री करणेसाठी परत केले जातील. त्याबाबतच्या नोंदी लॉण्ड्री मदतनीस ठेवतील. एकूण धुवून इस्त्री करुन आलेले कपडे इमारतीमध्ये पोहोच केल्यानंतर, दिलेल्या कपड्यांची पोहोच पावती निविदाधारक यांनी संस्थानचे स्थायी कर्मचारी यांना कपडे धुऊन व इस्त्री करुन बरोबर मिळाले आहेत. याबाबत स्वाक्षरी घेऊन पोहोच पावती द्यावयाची आहे.

अशा धुऊन दिलेल्या कपड्यांच्या तपशीलाप्रमाणे महिन्याचे अखेरीस निविदाधारक यांनी बील सादर करावयाचे आहे. सदरचे बीलाची रक्कम ही धुऊन दिलेल्या पोहोच पावत्यांच्या नोंदी प्रमाणे असल्यास, बील सादर केले नंतर १५ दिवसांचे अंतराने बील अदा करण्यात येईल.

❖ **प्रशिक्षण आणि शिक्षण**

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागामधील संस्थानचे बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणे कामासाठी वापरण्यात येणारा कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असावा. कपड्यांचा दर्जा व स्वच्छता राखण्यासाठी तसेच चांगली सेवा मिळावी याकरीता कर्मचा-यांना त्यांचे कामानुसार प्रशिक्षण देणे गरजेचे आहे त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

❖ **जबाबदारी**

❖ **कॉन्ट्रॅक्टरची**

१) साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळेमधील बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणे कामाचे संस्थान प्रशासनाचे सोईप्रमाणे दररोजचे वेळापत्रक तयार करण्यात यावे व त्याप्रमाणे काम करावे.

२) योग्य उपकरणे आणि साहीत्याचा वापर करावा.

३) साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळेचे परिसरात लॉन्ड्री कामासाठी वापरण्यात येणारे वाहनावर आपल्या लॉन्ड्रीचे नांव किंवा बोधचिन्ह असावे.

४) संस्थान प्रशासनाचे वरिष्ठांनी दिलेल्या प्रासंगिक सूचनांना तात्काळ प्रतिसाद देणेत यावा.

५) संस्थान कर्मचारी व भक्तांबरोबर सभ्य व मैत्रीपूर्व वागणूक असावी.

६) कायद्यातील तरतुदीप्रमाणे कर्मचा-यांचा पगार देण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

❖ **संस्थान मार्फत मुल्यमापन**

निविदाधारक पुरवित असलेल्या सेवा व कामाचे दर महिन्याला मूल्यमापन करण्यात येईल. निविदाधारकाकडून बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणेसाठी वापरात असलेले साहीत्य तपासणीचा अधिकार संस्थानला राहील. केमिकल कमी दर्जाचे किंवा कमी गुणवत्तेचे आढळल्यास कार्यादेश रद्द करुन संस्थान खाती जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कत जप्त करण्यात येईल.

## ❖ साईआश्रम भक्तनिवासमधील स्टोअर व दररोज धुण्यासाठी असलेल्या कपड्यांची संख्या

| अ.नं. | इमारतीचा तपशील | एकूण इमारत संख्या | प्रत्येक इमारतीमधील स्टोअर संख्या | एकूण स्टोअरची संख्या | लॉण्ड्री कामासाठी एका दिवसाची कपड्यांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | A,B,C,(AC) | ३ | ८ | २४ | १) बेडशीट- १६०० |
| २ | D,E,F,G,H,I,J,K,L (NAC) | ९ | ८ | ७२ | २) उशीकव्हर- १५०० ३) टॉवेल- २०० |
| | एकूण | १२ | --- | ९६ | ४) सोलापूर चादर- १०० ५) चादर(ब्लॅकेट)-२५० |

## ❖ साई धर्मशाळेमधील स्टोअर व दररोज धुण्यासाठी असलेल्या कपड्यांची संख्या

| अ.नं. | इमारतीचा तपशील | एकूण इमारत संख्या | प्रत्येक इमारतीमधील स्टोअर संख्या | एकूण स्टोअरची संख्या | लॉण्ड्री कामासाठी एका दिवासाची कपड्यांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | A, B, C, D, E, F | ६ | ८ | ४८ | १) बेडशीट- ६०० |
| | एकूण | ६ | ८ | ४८ | २) उशीकव्हर- ५०० ३) टॉवेल- नाही ४) सोलापूर चादर- ३० ५) चादर(ब्लॅकेट) -१०० ६) गादी खोळी – उत्सव व नंतर जेवढे असेल. |

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

मान्य

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे पत्र.

दिनांक- / /२०

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर.

विषयः- साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील दिनांक:-०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ अखेर एक वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे,टॉवेल धुवून ड्राय करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट)धुणे व गादीच्या खोळी धुणे कामाची ई-निविदा...

महोदय,

खालील सही करणार, मी/आम्ही कळवितो की,वरील विषयाबाबत आपण महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या ई-निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी–शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस ई-निविदेमध्ये नमूद केले प्रमाणे संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडीलबेडशीट, उशी कव्हर धूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेचे काम करुन देण्याची तसेच त्यासाठी लागणारे सर्व साहीत्य/मशिनरी व उच्चतम दर्जाचे केमिकल/डिटर्जंट स्वतः वापरणार आहे. याबाबतची हमी देत आहे/आहोत.

कार्यादेश प्राप्त झालेनंतर कामाची हमी म्हणुन एकूण वार्षिक खर्चास मिळालेल्या मान्यता रकमेवर ३% सुरक्षा अनामत रक्कम ई-निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोखीने भरणा करुन देऊ.

आपला/आपले विश्वासु,

सही व शिक्का

१)लॉण्ड्री निविदाधारकाकडे खाली नमुद केलेल्या मशिनरी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याबाबत तक्त्याखाली सही शिक्क्या निशी सदरचे पानस्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावयाचे आहे.

| अ.नं. | मशिनचे नांव | क्षमता | मशिनचे काम | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वाशिंग मशिन | ६० किलो/ग्रॅम | कपडे धुणे करीता | १ |
| २ | वाशिंग मशिन (अॅटोमॅटिक) | ३० किलो/ग्रॅम | कपडे धुणे करीता | १ |
| ३ | हायड्रोएक्स ट्रॅक्टर | ३० किलो/ग्रॅम | कपडे पिळणे करीता | १ |
| ४ | हायड्रोएक्स ट्रॅक्टर | २५ किलो/ग्रॅम | कपडे पिळणे करीता | १ |
| ५ | ड्रायर मशिन | ३० किलो/ग्रॅम | कपडे वाळविणे करीता | १ |
| ६ | कॅलेंडर मशिन | इलेक्ट्रीक हिटर | कपडे इस्त्री करणे करीता | १ |
| ७ | इस्त्री टेबल | ---- | | २ |

२) उपरोक्त अ.नं.२ मध्ये नमुद केलेल्या मशिनरी व्यतिरिक्त आपणाकडे इतर काही जादा मशिनरी असल्यास त्याचा उल्लेख खालील तक्त्यात नमुद करण्यात यावा व सदरचे पानस्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावयाचे आहे.

| अ.नं. | मशिनचे नांव | क्षमता | संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |
| ८ | | | |
| ९ | | | |
| १० | | | |

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

मान्य

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

९

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर(ब्लॅंकेट) धुणे, गादीच्या खोळी धुणेचे कामचा B.O.Q.**

| अ.नं | कपड्यांचा तपशील | अंदाजित कपडयांची संख्या | सर्व करासह प्रति नग दर | अक्षरी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | २६,५४५ | | |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | ३५,६०१ | | |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ९,६४९ | | |
| ४ | सोलापूर चादर धुणे | ७,४३२ | | |
| ५ | चादर (ब्लॅंकेट) धुणे | ५,९५६ | | |
| ६ | गादीच्या खोळी | १,५०० | | |

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.